क्र.पोमसं/३१/२२३५/ठेसंवियो/२०२२-२०२३/२२७/२०२२ मुंबई दि २८/०७/२०२२

**संदर्भ** - शासन निर्णय क्रमांक-बीयुडी-०६२२/प्र.क्र.११३/आस्था-१ दि २०/०५/२०२२

**विषय - लेखा अनुदान २०२२-२०२३**
मागणी क्र. बी-६, मुख्य लेखाशिर्ष २२३५,
सामाजिक सुरक्षा व कल्याण, १०४ ठेव संलग्न विमा योजना
अंतर्गत अनुदान वाटप

**---आदेश---**

शासन निर्णय क्रमांक-बीयुडी-०६२२/प्र.क्र.११३/आस्था-१ दि २०/०५/२०२२ अन्वये सन २०२२-२०२३ या वित्तीय वर्षाकरिता मागणी क्र. बी-०६, मुख्यलेखाशिर्ष २२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण १०४-ठेव संलग्न विमा योजने अंतर्गत मृत शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या वारसदारांना अनुदान मंजुर करण्याकरिता शासनाने पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना एकुण रु १,०५,००,०००/- (अक्षरी रु. एक कोटी पाच लाख फक्त) इतका निधी चिन्हांकित करुन स्वतंत्रपणे अर्थ संकल्पिय संगणकीय वितरण प्रणालीद्वारे (BDS) वाटपासाठी उपलब्ध करुन दिलेला आहे. सोबत शासन आदेशाची प्रत जोडलेली आहे.

२. उपरोक्त शासन निर्णयान्वये शासनाने चिन्हांकित करुन दिलेला रु १,०५,००,०००/- (अक्षरी रु. एक कोटी पाच लाख फक्त) निधी या कार्यालयाच्या प्रतीक्षायादीवरील संबंधित मृत १७५ अधिकारी/कर्मचा-यांच्या वारसदारांना सोबत जोडलेल्या यादीनुसार वाटप करण्यात येत आहे. ठेव संलग्न विमा योजनेअंतर्गत अनुदान मंजुरीचे प्राधिकार क्षेत्रीय कार्यालय प्रमुखांना प्रदान करण्यात आलेले असल्यामुळे, खालील नमूद घटक प्रमुखांनी त्यांच्या अधिपत्याखालील मृत अधिकारी/ कर्मचा-यांच्या वारसदारांचे अनुदान मंजुरीचे आदेश तात्काळ निर्गमित करुन त्याची प्रत या कार्यालयास पाठवावी.

३. शासनाने सदर शासन निर्णयान्वये चिन्हांकित करुन दिलेला निधी दि ३१/१२/२०२२ पर्यंत कोणत्याही परिस्थितीत खर्च होणे आवश्यक आहे. सदर निधीचा विनियोग पुर्णत: न केल्यास किंवा व्यपगत झाल्यास त्याची सविस्तर कारणे शासनास व लोकलेखा समितीस सादर करावी लागतात याची कृपया नोंद घ्यावी. तरी संबंधित कोषागार कार्यालयास त्यासंबंधीची अचूक देयके सादर करावीत व ती देयके कोणत्याही परिस्थिती दि ३१/१२/२०२२ पूर्वी पारित करुन घ्यावीत. तसेच, संबंधित मृत अधिकारी/कर्मचा-यांच्या वारसदारांना रक्कम अदा करणे ही, सर्वस्वी जबाबदारी सर्व संबंधित घटक प्रमखाची असल्यामुळे, सदर प्रकरणांची तातडी व गांभीर्य लक्षात घेऊन या प्रकरणी स्वत: लक्ष देऊन, त्यांचे कार्यालयातील लिपीक वर्गीय अधिकारी/कर्मचा-यांना त्याप्रमाणे विहीत कालावधीत अचूक व परिपुर्ण कामे करण्याबाबत सक्त सूचना द्याव्यात, जेणेकरुन शासनाने चिन्हांकित करुन दिलेल्या निधीचा विनियोग पुर्णत: होईल. संबंधित वारसदारांना अनुदान अदा केल्यानंतर त्यांची दिनांकित अदा रोल पावती देयकाच्या कोषागार प्रमाणपत्र क्रमांक दिनांकासह शासनास व महालेखापाल-१, मुंबई /महालेखापाल-२, नागपूर तसेच या कार्यालयास दिनांक ३१/१२/२०२२ पूर्वी न चुकता सादर करावी.

४. असेही निर्देश देण्यात येत आहेत की, उपलब्ध करुन दिलेल्या वरील रकमेच्या खर्चाचा ताळमेळ, महालेखापाल यांचे तसेच शासनामार्फत वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार योग्य प्रकारे व योग्यवेळी करुन त्याबाबतची प्रमाणित माहिती शासनास विहीत मुदतीत पाठविण्यात यावी. त्यानुसार शासनाने चिन्हांकित करुन दिलेल्या निधीनुसार, या कार्यालयाने मंजूर केलेल्या अनुदानाच्या खर्चाबाबतचा ताळमेळ संबंधित कोषागार कार्यालय व महालेखापाल यांचे कार्यालयातील नोंदविलेल्या खर्चाशी करुन खर्चमेळाची प्रमाणित माहिती दिनांक ३१/१२/२०२२

पुर्वी महालेखापाल यांचे कार्यालयाकडून प्रमाणित करुन पाठविण्याची संपुर्ण जबाबदारी ही क्षेत्रीय कार्यालय प्रमुखांची राहील त्याप्रमाणे माहिती न पाठविणा-या कार्यालयातील संबंधितावर जबाबदारी निश्चीत करुन कारवाई करणे भाग पडेल याची कृपया नोंद घ्यावी. प्रमाणित न केलेली माहिती स्विकारण्यात येणार नाही व या कारणामुळे विलंब झाल्यास त्यांची संपुर्ण जबाबदारी क्षेत्रीय विभाग/ कार्यालय प्रमुखांची राहील.

५. सदरचा खर्च हा सन २०२२-२०२३ या वित्तीय वर्षातील, गृह विभाग, मागणी क्र. बी-६ मुख्यलेखाशिर्ष "२२३५ सामाजिक सुरक्षा व कल्याण" गौणशिर्ष-१०४ ठेव संलग्न विमा योजना (सांकेतिक क्रमांक २२३५१६८४) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो वित्तीय वर्ष २०२२-२०२३ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. तसेच सदरचा खर्च हा याच लेखाशिर्षाखाली नोंदविला गेला आहे, याची खातरजमा करण्याची कृपया नोंद घ्यावी.

**(टिप- मागील आदेशामधील अनुदान काही काराणास्तव ~~अनुदान~~ व्यपगत झाल्यामुळे या कार्यालयाच्या दि २१/१२/२०१९ रोजीच्या आदेशातील अनुक्रमांक ५ वर नमुद मयत शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या वारसदारांना अनुदानाचे वाटप करण्यात आलेले नाही. तरी त्यांचे नाव पुन्हा आदेशामध्ये घेण्यात आले आहे . )**

(एस. जयकुमार)
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांचे कार्यालय

प्रति,

पोलीस आयुक्त, ठाणे शहर/नवी मुंबई/पुणे शहर/सोलापूर शहर/नागपूर शहर/औरंगाबाद शहर/ अमरावती शहर

पोलीस उप महानिरीक्षक, रा.रा.पो.बल, महाराष्ट्र राज्य, पुणे

पोलीस अधीक्षक, सांगली, बीड, गडचिरोली, अमरावती ग्रामीण, कोल्हापूर, जळगांव, उस्मानाबाद, बुलढाणा, नांदेड, अहमदनगर, सोलापूर ग्रामीण, चंद्रपूर, वर्धा, पालघर, हिंगोली, गोंदिया, पुणे ग्रामीण, परभणी, जालना, अकोला, वाशिम, धुळे, नाशिक ग्रामीण, नंदूरबार, रायगड,सातारा, लोहमार्ग औरंगाबाद, भंडारा, लोहमार्ग पुणे, रत्नागिरी, ठाणे ग्रामीण, औरंगाबाद ग्रामीण, लातुर.

पोलीस अधीक्षक, बिनंतारी संदेश विभाग-पुणे,

प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, अकोला,

संचालक महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक

समादेशक, रा. रा. पो. बल. गट क्र. ६ धुळे, १ पुणे, १२ हिंगोली

निधी वितरण २०२२-२३.
मागणी क्र. बी-६, मुख्यलेखाशिर्ष-२२३५१६८४, सामाजिक सुरक्षा व कल्याण, १०४- ठेव संलग्न विमा योजना.

**महाराष्ट्र शासन**
गृह विभाग
शासन निर्णय क्र.- बीयुडी ०६२२/प्र.क्र.११३/आस्था-१
मंत्रालय, मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २० जुन, २०२२.

**संदर्भ** :- १) शासन परिपत्रक वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थ-२०२२/प्र. क्र.४३/अर्थ-३, दि.४/४/२०२२.

**प्रस्तावना** :-

सन २०२२-२३ या वित्तीय वर्षासाठी गृह विभागाच्या "मागणी क्र. बी-६, मुख्यलेखाशिर्ष-२२३५१६८४, सामाजिक सुरक्षा व कल्याण, १०४-ठेव संलग्न विमा योजना" या अंतर्गत रु. ६,०७,४०,०००/- (रु. सहा कोटी सात लक्ष चाळीस हजार फक्त) इतकी तरतूद मंजूर करण्यात आली आहे. वित्त विभागाच्या संदर्भीय शासन परिपत्रान्वये माहे डिसेंबर २०२२ पर्यंत मंजूर तरतूदीच्या ६०% इतकी रक्कम टप्याटप्याने वितरीत करण्यात येणार आहे. त्यानुसार सदर तरतुदीमधील रु. ६,०७,४०,०००/- (रु. सहा कोटी सात लक्ष चाळीस हजार फक्त) या अर्थसंकल्पीय तरतुदीपैकी सद्यस्थितीत रु. १,२७,६०,०००/- (रु. एक कोटी सत्तावीस लक्ष साठ हजार फक्त) इतका निधी (सुमारे २१%) वित्त विभागाकडून संगणकीय प्रणालीद्वारे (बीम्स) वितरीत करण्यात आला आहे.

शासन निर्णय वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थ-२०२२/प्र. क्र.४३/अर्थ-३, दि.४/४/२०२२ अन्वये वितरीत केलेला निधी विभागाच्या अखत्यारीतील कार्यालयांना सन २०२२-२३ साठी उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** :-

उपरोक्तनुसार सन २०२२-२३ या वित्तीय वर्षासाठी "मागणी क्र. बी-६, मुख्यलेखाशिर्ष-२२३५१६८४, सामाजिक सुरक्षा व कल्याण, १०४- ठेव संलग्न विमा योजना" अंतर्गत अर्थसंकल्पीय तरतूद रक्कम रु. ६,०७,४०,०००/- (रु. सहा कोटी सात लक्ष चाळीस हजार फक्त) या मंजूर निधीतून अर्थसंकल्पीय तरतुदीच्या २१% निधी गृह (खुद्द) व इतर अधिनस्थ क्षेत्रीय कार्यालयांना वितरीत करण्यात येत असून वितरणाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे:-

Spl Inspector General of Police (Admn)
Maharashtra State Mumbai
DO-31

| "मागणी क्र-बी .६, मुख्यलेखाशिर्ष"ठेव संलग्न विमा योजना -१०४ ,सामाजिक सुरक्षा व कल्याण ,२२३५१६८४- | | | |
|---|---|---|---|
| | | | (रुपये हजारात) |
| अ. क्र. | नियंत्रक अधिकारी | सन २०२२-२३ साठी अर्थसंकल्पित निधी | २१% वितरण |
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | गृह विभाग (खुद्द) | ३०० | ६३ |
| २. | पोलिस महासंचालक,म.रा., मुंबई | ५०००० | १०५०० |
| ३. | महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई. | १८० | ३८ |
| ४. | अपर पोलिस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक, म.रा.,मुंबई | ६० | १३ |
| ५. | पोलिस आयुक्त, बृहन्मुंबई. | ७५०० | १५७५ |
| ६. | अपर पोलिस महासंचालक तथा कारागृह महानिरीक्षक,म. रा.,मुंबई. | १८० | ३८ |
| ७. | महासमादेशक,होमगार्डस, म. रा.,मुंबई | ३०० | ६३ |
| ८. | संचालक,नागरी संरक्षण संचालनालय, मुंबई | ४२० | ८९ |
| ९. | परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य,मुंबई. | ३०० | ६३ |
| १०. | आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,म. रा., मुंबई | ७२० | १५२ |
| ११. | संचालक,न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, म.रा.,मुंबई. | ३०० | ६३ |
| १२. | संचालक,अभियोग संचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई | १२० | २६ |
| १३. | प्रबंधक,मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, मुंबई. | १२० | २६ |
| १४. | मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई | २४० | ५१ |
| १५. | सचिव,महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग,म.रा.मुंबई. | ० | ० |
| १६. | राज्य परिवहन अपिल न्यायाधिकरण,मुंबई. | ० | ० |
| | एकूण | ६०७४० | १२७६० |

उपरोक्त तक्त्यामध्ये एकूण अर्थसंकल्पीय तरतुदीच्या २१ % मर्यादेत "मागणी क्र. बी-६, मुख्यलेखाशिर्ष-२२३५१६८४, सामाजिक सुरक्षा व कल्याण, १०४- ठेव संलग्न विमा योजना" अंतर्गत रु. ६,०७,४०,०००/- (रु. सहा कोटी सात लक्ष चाळीस हजार फक्त) यापैकी रु. १,२७,६०,०००/- (रु. एक कोटी सत्तावीस लक्ष साठ हजार फक्त) बिम्सवर वितरित करण्यात येत आहे. सदर निधी गृह विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय कार्यालयाच्या नियंत्रण अधिका-यांना खर्च करण्याच्या अनुषंगाने देण्यात आलेला संकेतांक क्रमांक व कोषागार क्रमांक या खाली स्वतंत्रपणे अर्थसंकल्प संगणकीय वितरण प्रणालीद्वारे (बिम्सद्वारे) वितरीत करण्यात येत आहे.

२. उपलब्ध करुन दिलेल्या वरील रक्कमेचा खर्च ताळमेळ, महालेखापाल यांच्या कार्यालयास नोंदविलेल्या खर्चाशी महाराष्ट्र अर्थसंकल्पीय नियम पुस्तिका प्रकरण १४ मधील नियम १५७ च्या परिशिष्ट-३ तसेच शासनामार्फत वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार योग्य प्रकारे व योग्यवेळी करुन त्याबाबतची प्रमाणित माहिती शासनास विहित मुदतीत पाठविण्यात यावी. खर्च मेळाची माहिती महालेखापाल यांच्या कार्यालयाकडून प्रमाणित करुन पाठविण्याची संपूर्ण जबाबदारी विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुखांची राहील. उपलब्ध केलेला निधी वित्त विभाग, शासन